प्रतिष्ठेत,

प्रिय ------------------------------------------------

आणि ------------------------------------------------

(येथे विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांची नावे, आई आणि वडील दोहोंची नावे लिहून हा अंक त्यांना वाचावयास देणे.. वाचून दाखविणे.)

लेंड अ हँड इंडिया

# कृतीशील संवाद

शैक्षणिक वर्ष २०१५–१६ ● सप्टेंबर २०१५

(फक्त खाजगी वितरणासाठी)

Lend A Hand India

## मनोगत




**सुनंदा माने** (कार्यकारी संचालिका, लेंड अ हँड इंडिया, पुणे)

पाच सप्टेंबर हा 'शिक्षक दिन' आपण सर्वांनी नुकताच साजरा केला.

सर्वपल्ली राधाकृष्णन भारताचे दुसरे राष्ट्रपती होते, त्याचबरोबर ते विसाव्या शतकातील धर्म आणि तत्वज्ञानाचे अभ्यासक व विद्वान म्हणून प्रसिद्ध होते. कलकत्ता विद्यापीठ आणि ऑक्सफर्ड विद्यापीठ, इंग्लंड येथे त्यांनी प्राध्यापक म्हणून काम केले. तसेच ते आंध्र विद्यापीठ आणि बनारस हिंदू विद्यापीठांचे कुलगुरू होते. भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' त्यांना दिला गेला होता.

ते जेव्हा राष्ट्रपती झाले तेव्हा त्यांच्या काही मित्रांनी त्यांचा वाढदिवस (५ सप्टेंबर) साजरा करण्याबद्दल परवानगी मागितली. त्यावेळी ते म्हणाले, 'माझा वाढदिवस साजरा करण्यापेक्षा, हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केल्यास मला अभिमान व विशेष वाटेल.' ते असे म्हणत की, 'शिक्षक ही देशातील सर्वोत्तम मन असलेली व्यक्ती असली पाहिजे.' मला वाटते आपण लक्षात घेतले पाहिजे की त्यांनी सर्वात हुशार किंवा बुद्धिमान व्यक्ती असे म्हटले नाही तर, सर्वोत्तम मन असलेली व्यक्ती असे म्हटले आहे.

शाळा, कॉलेज यांमध्ये चांगले शिक्षक मिळणे हे खूपच महत्वाचे असते. आपण खूप वेळा ऐकतो की मला मिळालेल्या चांगल्या शिक्षकांमुळे मी आज इथे पोहोचलो, त्यांनी मला प्रोत्साहन दिले म्हणून माझी वाढ झाली, वगैरे वगैरे.


खरे पाहिले तर आपण फक्त शिक्षकांकडून शिकतो का? आजच्या माहिती – तंत्रज्ञानाच्या युगात 'Google' हा जवळ जवळ आपणा सर्वांचाच गुरु असू शकेल. पण 'Google' फक्त माहिती देतो, त्या माहितीचा वापर करायचा असेल तर, त्या माहितीच्या आधारे काही निर्णय घ्यायचा असेल तर, आपल्याला विचार करायला लागतो. Google निर्णय देत नाही तर निर्णयाच्या प्रक्रियेस मदत करतो. संभाषण, मार्गदर्शन, चर्चा या गोष्टी विचार करायला शिकवत असतात. दुसऱ्याचे विचार, म्हणणे, ऐकून घेणे, त्यावर विचार करता येणे व स्वतःचे विचार मांडता येणे हे ही महत्वाचे आहे.

एखादी गोष्ट आपल्याला समजली की ती चांगली लक्षात राहते, अगदी कित्येक वर्षांनी सुद्धा. IBT किंवा MSFC विषयाशी निगडीत आपल्या सर्वांनाच माहिती आहे की हात, मन व मेंदू या एकत्र येऊन ज्या–ज्या गोष्टी आपण करतो त्या कायमच्या लक्षात राहतात. मग असे म्हणायलाही हरकत नाही का की प्रत्यक्ष अनुभव हा देखील एक शिक्षकच आहे?



**कृतीशील अनुभव**
**हा उत्तम शिक्षक असतो!**
**आणि उत्तम शिक्षक**
**हा प्रेरणादायी अनुभव असतो! !**

# धनाजी नाना विद्यालय, खिरोदा



खानदेशातील जळगाव जिल्ह्यातील खिरोदा येथील जनता शिक्षण मडळ ही स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेली संस्था आहे. १९३१ साली कै. धनाजी नाना चौधरी यांनी स्वराज्य आश्रमाची स्थापना केली. १९३८ साली या आश्रमाचे रुपांतर जनता शिक्षण मंडळ या संस्थेत झाले.

ग्रामीण भागाच्या विकासासाठी, ग्रामीण भागातच लघु उद्योग मोठ्या प्रमाणात सुरु झाले पाहिजेत. यात नवीन तंत्र वापरले गेले पाहिजे, त्यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कौशल्य शिक्षण देणे आवश्यक आहे, या हेतूने संस्थेचे माजी अध्यक्ष तसेच माजी शिक्षण मंत्री आणि माजी विधान परिषद अध्यक्ष श्री. मधुकरराव चौधरी यांच्या प्रोत्साहनाने २००७ साली लेंड अ हँड इंडियाच्या सहकार्याने धनाजी नाना विद्यालय, खिरोदा येथे IBT (व्ही–१) हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला.



**मुख्याध्यापक बोरोळे**

सध्या बोरोळे सर शाळेचे मुख्याध्यापक आहेत. चेतन चौधरी (अभियांत्रिकी), किरणकांत महाजन (ऊर्जा – पर्यावरण), सूरज महाजन (शेती – पशुपालन), विद्या पाटील (गृह – आरोग्य) असे चार निदेशक येथे कार्यरत असून भारती भागवत बढे समन्वयिका आहेत. राष्ट्रीय व्यवसाय शिक्षण आराखडा कौशल्य विकास समिती यांच्या पूर्व व्यावसायिक व्यवसाय अभ्यासक्रम (व्ही–१), या अभ्यासक्रमाची हस्तपुस्तिका तयार करण्यासाठी भारती भागवत–बढे यांची समिती सदस्य म्हणून निवड झालीआहे.



**निदेशक आणि समन्वयिका**

येथील IBT च्या विद्यार्थ्यांनी अनेक प्रकल्प केले असून नानाविध वस्तू तयार केल्या आहेत. उटणे, त्याचे पॅकिंग, स्क्रीन–प्रिंटींग, लेबलिंग, चप्पल–स्टँड बनविण्यात आले. अगदी FM रेडियो देखील बनविला आहे.

खानदेशात केळी मुबलक प्रमाणात होतात, केळीच्या धाग्यांपासून राख्या तयार करण्यात आल्या. शाळेत होणाऱ्या प्रत्येक समारंभात IBT च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेली फुले मान्यवरांना दिली जातात. आठवी ते दहावीच्या शाळेतील इतर विद्यार्थिनींसाठी गृह विभागातर्फे मोफत शिवण क्लास घेण्यात येतात. मध्यंतरी शाळेला रंग देण्यात आला, तेव्हा रिकाम्या झालेल्या रंगांच्या टाकाऊ डब्यांपासून केराचे डब्बे तयार करून प्रत्येक वर्गात ठेवण्यात आले.

गांडूळ–खत तयार करून वांगी, मिरच्या, मेथी, पालक, टोमॅटो, रताळ्यांची लागवड करण्यात आली.

अंडी उबवणी केंद्र चालू करण्यात आले. त्यातून जन्मलेली पिल्ले आदिवासी मुलांना देण्यात आली. त्यातून पुढे त्यांना अंडी मिळतील आणि त्यांचे आरोग्य सुधारेल हा विचार या मागे आहे.

एका वर्षी बटाट्याची लागवड पारंपारिक तसेच मल्चिंग अशा दोन्ही पद्धतीने करण्यात आली. त्यातून विद्यार्थ्यांना दोन्ही पद्धतींमधील फरक व फायदे–तोटे समजले. बटाट्याचे पीक आल्यानंतर गृह विभागाच्या साहाय्याने शाळेतच बटाट्याची भाजी करून सहभोजनाचा कार्यक्रम आयोजिला.

डाळींबी रवींद्र सरोदे या विद्यार्थिनीने स्वतःहून पुढाकार घेऊन अजून सात विद्यार्थिनींच्या साहाय्याने कचऱ्यापासून कांडी–कोळसा बनविला. याच विद्यार्थिनीने दहावीला ९५ टक्के गुण मिळवून शाळेत पहिली येण्याचा मान पटकाविला. तिच्या सोबतच्या इतर सातही विद्यार्थिनींनी देखील उत्तम गुण मिळविले.





**कांडी–कोळसा बनविताना डाळींबी रवींद्र सरोदे आणि इतर विद्यार्थिनी**

खिरोद्याच्या धनाजी नाना विद्यालयाचे अभिनंदन आणि शुभेच्छा!

# दहावी पास झाल्यानंतर IBT विद्यार्थ्यांनी पुढील शिक्षणासाठी केलेल्या निवडीचा आढावा



दहावीनंतर पुढे काय? हा सर्वच विद्यार्थ्यांच्या बाबतीत महत्वाचा मुद्दा असतो. उच्च शिक्षण घेताना आपला कल, क्षमता यांचाही विचार होणे गरजेचे असते. निव्वळ महाविद्यालयीन शिक्षणाच्या मागे न लागता तांत्रिक शिक्षणाकडे जाण्याचा पर्याय निवडणे हा देखील हमखास रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे.

लेंड अ हँड इंडिया द्वारा महाराष्ट्रात राबविल्या जाणाऱ्या रोजगार आणि व्यवसायलक्षी अशा बहुविध कौशल्य पायाभूत अभ्यासक्रमातील विद्यार्थी–विद्यार्थिनी दहावीनंतर पुढे कोणता पर्याय निवडतात याचे सर्वेक्षण ऑगस्ट–२०१४ महिन्यात करण्यात आले. महाराष्ट्रातील प्लान–१०० प्रकल्पातील ३३ शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१३–१४ मधील विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या पुढील वाटचालीचा हा आढावा :–

८६१ विद्यार्थी व ६४४ विद्यार्थिनी अशा एकूण १,५०५ जणांचे सर्वेक्षण करण्यात आले. यातील ११३ जण आयटीआय, ४० पॉलिटेक्निक, तर ७३ डिप्लोमा असे २२६ जण तांत्रिक शिक्षणाकडे वळले, यात ६१ विद्यार्थिनी आहेत. आर्टस–कॉर्स–सायन्स या रूढ मार्गाने १,१३२ जण गेले (विद्यार्थी : ६१६, विद्यार्थिनी : ५१६). नापासांची संख्या १२ आहे तसेच पास होऊन देखील पुढे काहीही न शिकणाऱ्यांची संख्या ३१ आहे. यात १०३ जणांची माहिती उपलब्ध झाली नाही.

सर्वसाधारणपणे असा निष्कर्ष निघतो की ७५.२२% रूढ शिक्षणाकडे वळले तर १५.०२% तांत्रिक शिक्षणाकडे वळले. अर्थात ही सर्व आकडेवारी IBT हा विषय १० वी ला घेतलेल्या विद्यार्थ्यांची आहे. सर्वसाधारण गटात याची टक्केवारी वेगळी असेल.

सर्वेक्षणात विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया बोलक्या होत्या :– IBT उपक्रमामधील प्रात्यक्षिकांमुळे शिक्षण आनंददायी झाले, वेगवेगळे अनुभव मिळाले, IBT मधील प्रशिक्षणाचा घरी वापर करून पाहिला, उत्पादन व विक्री यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला, पहिल्या कमाईची गंमत अनुभवली, स्व–व्यवसाय करण्याचा आत्मविश्वास मिळाला, आदी.

| दहावी नंतर | विद्यार्थी | विद्यार्थिनी | एकूण |
|---|---|---|---|
| आर्टस् | २६० | २५६ | ५१६ |
| कॉमर्स | ११० | ९२ | २०२ |
| सायन्स | २४६ | १६८ | ४१४ |
| आयटीआय | १०२ | ११ | ११३ |
| पॉलीटेक्निक | २२ | १८ | ४० |
| डिप्लोमा | ४१ | ३२ | ७३ |
| लग्न | ० | १ | १ |
| नापास | १० | २ | १२ |
| घरी | १० | २१ | ३१ |
| माहित नाही | ६० | ४३ | १०३ |
| **एकूण** | **८६१** | **६४४** | **१,५०५** |

# IBT / MSFC अभ्यासक्रमात विशेष काय आहे? (दहावीनंतर पुढील शिक्षणासाठी IBT/MSFC चे फायदे)

माध्यमिक शालेय स्तरावर MSFC अभ्यासक्रमाचा व त्या अंतर्गत योजलेल्या विविध तंत्रज्ञानांचा व उपक्रमांचा आपल्या दैनंदिन जीवनाशी अतिशय जवळचा संबंध आहे. हा विषय शिकलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला विशेष अभिमान बाळगायला हवा की त्याला इतर विद्यार्थ्यांच्या पेक्षा खालील विशेष अनुभव व संधी उपलब्ध झाल्या :–

- MSFC मुळे विविध तंत्रज्ञानांची केवळ ओळखच होत नाही, तर वेगवेगळ्या प्रयोगांमधून प्रत्यक्ष अनुभवही मिळतो.
- MSFC मध्ये कृतीशील शिक्षणाला प्राधान्य दिलेले असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासास चालना मिळते.
- विद्यार्थ्यांमध्ये प्रयोगशीलवृत्ती जोपासण्यास मदत होते. चाकोरी बाहेरचा विचार करण्याची क्षमता मुलांमध्ये वाढीस लागते.
- प्रत्यक्ष कृती करून पाहिल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो त्यामुळे नवीन काहीतरी करून पाहायला अशी मुले सदैव पुढाकार घेतात आणि शाळेच्या परीक्षांबरोबरच जीवनातील परीक्षाही यशस्वीपणे पार पाडतात.
- तंत्रज्ञानाबरोबरच मुलांना कळत नकळत स्वतःची जाणीव व्हायला लागते. आपली आवड कशात आहे किंवा कोणत्या गोष्टी आपल्याला कमी आवडतात हे MSFC उपक्रमांमधून समजू शकते. उदा. एखाद्या विद्यार्थ्याला इलेक्ट्रिकलच्या कामामध्ये जास्त गोडी जाणवत असेल मात्र शेती व पशुपालन मध्ये तेवढी गोडी वाटत नसेल, या उलट एखाद्या विद्यार्थ्याला गृह व आरोग्यमधील उपक्रमांपेक्षा शेतीच्या कामामध्ये जास्त आवड असेल. याचा पुढील अभ्यासक्रमाची निवड करताना निश्चितच फायदा होऊ शकतो.
- MSFC चा सर्वात मोठा फायदा म्हणजे MSFC च्या मुलांसाठी विशिष्ट अभ्यासक्रमांकरता काही जागा राखीव असतात. उदा. आय.टी.आय.साठी २५%, डिप्लोमासाठी १५%, द्विलक्षी अभ्यासक्रमांसाठी ४०%; त्यामुळे MSFC च्या मुलांना(आपली आवड व क्षमता यानुसार) अभ्यासक्रम निवडताना प्रवेश प्रक्रियेत निश्चितच मदत होते.

# यशोगाथा : प्रियांका गावडे

कृतीशील संवादच्या फेब्रुवारी–२०१५ च्या अंकात लेंड अ हँड इंडिया द्वारा देण्यात येत असलेल्या विनाव्याजी कर्जाऊ शिष्यवृत्ती योजने विषयी सविस्तर माहिती प्रसिद्ध झाली होती. सदर योजनेचा लाभ अनेक विद्यार्थी–विद्यार्थिनींनी घेतला आहे. शिष्यवृत्तीमुळे त्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण करता आले आहे. शिष्यवृत्ती मिळालेल्यांपैकी प्रियांका गावडे ही एक विद्यार्थिनी होय.

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील गावडेवाडी येथील हिरकणी विद्यालय येथे लेंड अ हँड इंडियाच्या सहकार्याने IBT उपक्रम राबविण्यात येतो. प्रियांका गावडे हीने त्याच शाळेत ८वी, ९वी आणि १०वीचे शिक्षण घेत असताना IBT चे प्रशिक्षणही घेतले. अनेक प्रकल्पांत तिने सक्रीय सहभाग घेतला. सायकलच्या पायडलिंगद्वारे वीज निर्मिती करून दिवा पेटवणे आदी उपक्रम आजही तिच्या लक्षात आहेत. तिला अभियांत्रिकीची गोडी होती. घरी इलेक्ट्रिकची कामे ती स्वतःच करीत असे, अजूनही करते.



२००९ मध्ये दहावीला तिला ७५% गुण मिळाले आणि तिने सायन्सला प्रवेश घेतला. गणित हा विषयही तिचा आवडीचा आणि उत्तम होता. बारावीनंतर खरेतर तिला इंजिनिअरिंगला प्रवेश घ्यायचा होता. पण तिच्या हेही लक्षात आले की इंजिनिअर खूप झालेत आणि लगेच नोकरी मिळेल याची शाश्वतीदेखील नाही. हॉटेल मॅनेजमेंटमध्येही तिला रुची होती. पण आर्थिक अडचणीदेखील होत्या.

अशावेळी गावडेवाडी गावातील एक डॉक्टर आणि तिच्याच नात्यातील एक नर्स या दोघांनी तिला नर्सिंगचा पर्याय सांगितला. IBT मध्ये गृह–आरोग्य विभागात तिने यापूर्वी रक्तगट तपासणी केली होतीच. तेव्हा तिला ते आवडलेही होते. अनेकांना रक्त पाहून चक्कर येते, किंवा भीती वाटते मात्र प्रियांकाला सेवाभाव वृत्तीने आरोग्य–सेवा करायला आवडायचे. बारावीनंतर तिने पुण्यातील के.ई.एम. हॉस्पिटल येथे GNM (General Nursing Midwifery – सामान्य शुश्रुषा व प्रसूती–निगा) कोर्ससाठी प्रवेश घेतला. सदर कोर्स तीन वर्षांचा असतो. यालाच एक पर्याय म्हणजे – ANM (Auxiliary –साहाय्यक – Nursing Midwifery) कोर्स, पण हा फक्त दीड वर्षाचा कोर्स असून निम्न स्तरावरील आहे. म्हणून मग प्रियांकाने GNM कोर्सच केला. सदर कोर्स करताना पुढे आर्थिक अडचण आली. तेव्हा तिच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. विनोद बोंबले यांनी तिला लेंड अ हँड इंडिया द्वारा देण्यात येत असलेल्या विनाव्याजी कर्जाऊ शिष्यवृत्तीविषयी माहिती दिली. तिने त्यासाठी अर्ज केला आणि तिला दोन वर्षांसाठी आर्थिक साहाय्य मिळाले.

सहा महिन्यांपूर्वीच प्रियांकाने परीक्षा दिली असून ती उत्तीर्णही झाली. लगोलग तिला भारती हॉस्पिटल येथे नोकरी मिळाली. मात्र तेथील नोकरी सोडून तिने घरगुती शुश्रूषेच्या क्षेत्रात कार्यरत होण्याचे ठरविले. आजारी व्यक्तीला तिच्या घरीच सेवा–शुश्रुषा पुरविणाऱ्या 'रेडियंट होम हेल्थ केअर' या कंपनीचे पुणे कार्यालय ती आता सांभाळते आहे. IBT मध्ये गृह–आरोग्य विभागात घेतलेल्या प्रशिक्षणाचा बहुमोल उपयोग झाल्याचे ती आवर्जून सांगते.

कामाबरोबरच पुढे बी.एस.सी. नर्सिंग करण्याचेही तिच्या मनात आहे.

प्रियांकाचा धाकटा भाऊ, आदेश हा देखील IBT प्रशिक्षित असून दहावीनंतर त्याने औंध ITI येथून इलेक्ट्रोप्लेटिंगचा डिप्लोमा केला असून तो सध्या ॲप्रेंटिसशिप करीत आहे.

नर्सिंगच्या क्षेत्रात भरारी घेऊ इच्छिणाऱ्या प्रियांकाचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी लेंड अ हँड इंडिया तर्फे हार्दिक शुभेच्छा!

# MSFC अभ्यासक्रम विकास कार्यशाळा




आपल्या सर्वांना परिचित आहे की महाराष्ट्रात गेले दोन दशकांपेक्षा जास्त काळ सुरु असलेल्या IBT अभ्यासक्रमाला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून त्या विषयाचे नाव मल्टी स्किल फौंडेशन कोर्स (MSFC) असे झाले आहे. अभ्यासक्रमास राष्ट्रीय कौशल्य आराखड्या अंतर्गत ९वी व १०वी मध्येच MSFC लेव्हल–१ व MSFC लेव्हल–२ असे संबोधले जाईल आणि ११वी व १२वी मध्ये विद्यार्थ्यांना लेव्हल ३ व ४चा अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात येईल.

MSFC लेव्हल ३ व ४ चा अभ्यासक्रम आराखडा विकसित करण्यासाठी राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA), महाराष्ट्र राज्य यांचे द्वारा आणि भोपाळ स्थित पंडित सुंदरलाल शर्मा सेंट्रल इंस्टिट्यूट ऑफ व्होकेशनल एज्युकेशन (PSSCIVE) यांच्यातर्फे ऑगस्ट महिन्यात, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे येथे कार्यशाळा आयोजिण्यात आली होती. सदर कार्यशाळा चार दिवसांची होती. चारही विषयांतील तज्ज्ञ व्यक्तींना निमंत्रित करण्यात आले होते. लेंड अ हँड इंडिया संस्थेने संयोजनाची जबाबदारी सांभाळली होती.

कार्यशाळेस RMSA तर्फे डॉ. सुवर्णा खरात (राज्य प्रकल्प संचालक) आणि श्री. श्रीनिवास शास्त्री (अवर सचिव); PSSCIVE तर्फे श्री. आर. बी. शिवगुंडे (संयुक्त संचालक), डॉ. व्ही. एस. मेहरोत्रा (प्राध्यापक), डॉ. दीपक सुधलवार (साहाय्यक प्राध्यापक); महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ तर्फे श्री. जी. के. ममाणे (अध्यक्ष) व श्री. कल्याण गावडे (संशोधन विभाग) उपस्थित होते. सर्वांनी तज्ज्ञ व्यक्तींना अभ्यासक्रमाच्या विकसनाबाबत मार्गदर्शन केले.





**डॉ. माधव गजानन देव** यांनी अलीकडेच लाहीच्या कार्यालयास भेट दिली. त्यावेळी Brown Bag Lunch या अभिनव संकल्पनेद्वारे त्यांच्याशी लाही पुणे कार्यालयाच्या सर्व सदस्यांनी संवाद साधला. Brown Bag Lunch म्हणजे सर्वांनी एकत्र जेवायला जमायचे आणि आलेल्या पाहुण्यांशी आपापले डब्बे खात चर्चा करायची! पाहुण्यांनाही अर्थातच जेवायला दिले जाते.

पद्मश्री पुरस्काराने सन्मानित डॉ. माधव देव हे भारतातील एक अग्रगण्य वैद्यकीय शास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात, तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील त्यांच्या संशोधनाची दखल घेण्यात आली आहे.

प्रथिने ऊर्जा कुपोषण, गळ्यातील गाठीची वाढ होणारा आजार, कुष्ठरोग प्रतिबंधक लस, कर्करोग आदी बाबतीत त्यांचे योगदान मोलाचे आहे. आज 'आयोडाईज्ड मीठ' ही संकल्पना सर्वमान्य आणि अनिवार्य आहे, त्याचा उगम डॉ. देव यांच्या दशकभराहून अधिक अथक संशोधनाचा परिपाक आहे.

निवृत्तीनंतर डॉ. देव यांनी 'मुव्हिंग अॅकॅडमी ऑफ मेडिसिन अँड बायो मेडिसिन' ही संस्था स्थापली असून तेथे ते उपाध्यक्ष व सचिव म्हणून वयाच्या ऐंशी पार केल्यानंतरही कार्यरत आहेत.

सदर संस्थेद्वारे ज्ञानाची लालसा असणाऱ्या मेडिसिन आणि बायोमेडिसिनच्या विद्यार्थ्यांना संशोधन प्रोत्साहन देण्यासाठी महत्वपूर्ण उपक्रम राबवीत आहेत.

चर्चेदरम्यान डॉ. देव यांनी त्यांच्या विविध प्रकल्पांची सविस्तर माहिती दिली. प्रामुख्याने त्यांचे कार्य ग्रामीण आणि आदिवासी भागातील शालेय विद्यार्थ्यांवर वैज्ञानिक मानसिकतेचा संस्कार करणे तसेच आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान पोहोचविणे हे आहे.



*हे करून पहा..*

**ऐकणे हे एक महत्वपूर्ण संवाद कौशल्य आहे.**
**संवाद प्रक्रियेत अचूक संदेश प्राप्त करणे आणि त्याचा अर्थ-बोध होण्याची क्षमता असणे गरजेचे असते.**
**ऐकण्याचे कौशल्य विविधांगी उपयोगी असते, त्याविषयी..**

# आवाज की दुनिया..

परवा दुकानात मंगलाताईंना विचारलं, 'तुम्ही नारळ वाजवून का घेता?'

माझ्याकडे त्रासिकपणे पाहात त्या म्हणाल्या, 'तशी पध्दतच आहे!' आणि गेल्या की तरातरा निघून.

'कानाने आवाज कळतो' असे एक वाक्य आपण लहानपणी शिकलो. आज या वाक्याच्या पुढचे वाक्य समजून घेऊया. 'कानाने आवाज कळतो आणि त्या आवाजावरुन आपल्याला बरीच माहिती कळते.'

हे आवाजसुध्दा वेग-वगळ्याप्रकारे तयार होतात. म्हणजे कधी त्या वस्तूमधूनच आवाज येतो तर कधी त्या वस्तूवर काही ठोकावे लागते, मारावे लागते किंवा घासावे लागते. थोडक्यात काय, वेगवेगळे आवाज आपल्याला वेगवेगळ्या गोष्टी गंभीरपणे सांगत असतात आणि त्या तुम्हाला ऐकाव्याच लागतात. आता एव्हढे सगळे वाचल्यावर तुमच्या डोक्यात भणभण सुरू झाली असेल म्हणून तुम्हाला पाच प्रश्न विचारतो म्हणजे तुम्हाला हज्जार गोष्टी समजतील.



- ❑ कुकर मधला भात शिजला आहे, हे कसे कळते?
- ❑ पाण्याच्या बाटलीत किती पाणी आहे, हे तुम्हाला बाटली न उघडता कसे समजते?
- ❑ वेल्डींगचा टाका कच्चा नाही तर पक्का लागला आहे, हे कसे समजते?
- ❑ मडके भाजल्यावर ते पक्के आहे की नाही हे कुंभार कसे ओळखतो?
- ❑ खिशातून एखादे नाणे जमिनीवर पडले तर ते किती पैशाचे आहे, हे कसे कळते?

खरे म्हणजे या सर्व प्रश्नांची उत्तरे एकच आहे आणि ते तुम्हाला माहितही आहे. तुम्ही ते अनेकवेळा अनुभवले देखील आहे.

पण आजपासून तुम्ही आवाजाकडे बारकाईने लक्ष द्या. त्यातले सूक्ष्म फरक शोधा. आवाजातील चढ-उतार अनुभवा, म्हणजे मग आवाजच तुमच्याशी बोलू लागेल. नवीन गोष्टी सांगू लागेल त्या ऐका. आवाजाशी मैत्री करा.

तुमची आवाजाशी मैत्री झाल्यावर जर का मी तुम्हाला तो जुनाच प्रश्न विचारला, 'तुम्ही नारळ वाजवून का घेता?' तर तुम्ही मला मंगलाताईंसारखे उत्तर देणार नाही. तुमचे उत्तर त्यांच्याहून नक्कीच वेगळे असेल.

तुमचे उत्तर तर मला कळवाच पण कुठले-कुठले आवाज तुम्हाला काय-काय सांगतात तेही मला कळवा. मी तुमच्या खणखणीत पत्रांची वाट पाहतोय.

**- राजीव तांबे**
rajcopper91@gmail.com

---

**लेंड अ हँड इंडिया**

Lend A Hand India

९, जीवन विहार हौसिंग सोसायटी, प्राईड पॅनोरमा जवळ, ऑफ सेनापती बापट मार्ग,
पुणे, महाराष्ट्र - ४११ ०१६. दूरध्वनी : (०२०) २५६३ ००९२, ९५५२२ ४१९०५.

E-mail : lahi@lend-a-hand-india.org | www.lend-a-hand-india.org